**वरिष्ठ लिपीक (गट-क) संवर्गातून सहायक (गट-क)**
**या संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात**
**पदोन्नत्या/नेमणूका**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१९/२९०४/प्र.८**
**दिनांक :- 30 OCT 2019**

आ दे श

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **वरिष्ठ लिपीक (गट-क)** संवर्गात कार्यरत असलेल्या निम्न कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तीना अधीन राहून **सहायक (गट-क)** या संवर्गात वेतन बँड रुपये ९३००-३४८०० या वेतन बँड मधील ग्रेड वेतन रूपये ४२००/- या सुधारीत वेतन संरचनेत एतदर्थ, तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात पदोन्नत्या देण्यांत येत आहेत. पदोन्नती नंतर त्यांची पदस्थापना खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | पदधारकाचे नाव | सध्याचे पद व कार्यालय | पदोन्नतीने पदस्थापनेचे पद व कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.आर.आर. राजपुत | वरिष्ठ लिपीक / पुणे मंडळ | सहाय्यक / उपमुख्य अभियंता (प) / मुं.मं | श्रीम.विधे यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| २ | श्री. विजय शाहाकार | वरिष्ठ लिपीक / नागपूर मंडळ | सहाय्यक / मुलेअ/मुंबई मंडळ | रिक्त पदी |
| ३ | श्री एस डी ठोंबरे | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / मुंबई मंडळ | रिक्त पदी |
| ४ | श्रीम. पी के ढोले | वरिष्ठ लिपीक / अमरावती मंडळ | सहाय्यक / नागपूर मंडळ | रिक्त पदी |
| ५ | श्री के डी बडगुजर | वरिष्ठ लिपीक / नाशिक मंडळ | सहाय्यक / मि.व्य./बोरीवली /मुं.मं | रिक्त पदी |
| ६ | श्रीम ए ए सावंत | वरिष्ठ लिपीक /मुंबई मंडळ | सहाय्यक / मु. अ-२/प्रा | रिक्त पदी |
| ७ | श्री. ए ए शिंदे | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / मि.व्य./कुर्ला /मुं.मं | रिक्त पदी |
| ८ | श्री. जे डी राऊत | वरिष्ठ लिपीक /मुंबई मंडळ | सहाय्यक / कोकण मंडळ | रिक्त पदी |
| ९ | श्रीम पी आर सावंत | वरिष्ठ लिपीक /मुंबई मंडळ | सहाय्यक / वित्त नियंत्रक/प्रा | रिक्त पदी |
| १० | श्रीम एम एम राणे | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / मा.व.सं.त /कक्ष /प्रा | रिक्त पदी |
| ११ | श्री एस जे.इंदुलकर | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / मि.व्य.चेंबूर /मुं.मं | रिक्त पदी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | श्री एन आर गावडे | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / का. अ/कुर्ला /मुं.मं | रिक्त पदी |
| १३ | श्री. व्ही जे पाटील | वरिष्ठ लिपीक / मुंबई मंडळ | सहाय्यक / का. अ /फ/उ /दु.व.पु मंडळ | रिक्त पदी |
| १४ | श्री डी एन पाटील | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / मि.व्य. /वांद्रे /मुं.मं | श्री.चांदेकर यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| १५ | श्री पी जी चव्हाण | वरिष्ठ लिपीक / कोकण मंडळ | सहाय्यक / प्र. अ/ दु.व.पु. मंडळ | रिक्त पदी |
| १६ | श्रीम एस डी घोसाळकर, | वरिष्ठ लिपीक / मुंबई मंडळ | सहाय्यक / उपमु. कार्य अधि/ प्रा | रिक्त पदी |
| १७ | श्री डी एन सुर्वे | वरिष्ठ लिपीक / दु.व.पु. मंडळ | सहाय्यक / विधी सल्लागार /प्रा | रिक्त पदी |
| १८ | श्री सी बी हंकारे | वरिष्ठ लिपीक / कोकण मंडळ | सहाय्यक / मि.व्य./वांद्रे (प)/ मुं.मं | रिक्त पदी |
| १९ | श्री एम एन भोसले | वरिष्ठ लिपीक / मुंबई मंडळ | सहाय्यक / कोकण मंडळ | रिक्त पदी |
| २० | श्री कुणाल ए म्हस्के | वरिष्ठ लिपीक / प्राधिकरण | सहाय्यक / सचिव /प्रा | रिक्त पदी |

२/- उक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतर अनुज्ञेय मूळ वेतनाबरोबर महागाई भत्ता व इतर भत्ते नियमानुसार देय राहतील. तसेच, अनु क्र. १,२,४, व ५ वरील कर्मचा-यास बदली प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

३/- सदरहू, पदधारकांच्या तात्पुरत्या पदोन्नतीने केलेल्या नेमणूका, प्रशासकीय सेवा संवर्गाच्या प्रारुप सेवाप्रवेश नियमांच्या अधीन राहून त्यांना पदोन्नतीच्या व अन्य संवर्गात ज्येष्ठतेनुसार तसेच त्यांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या एतदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांच्या या संवर्गातील कायम पदांवर कोणताही हक्क/धारणाधिकार राहाणार नाही, या अटीवर करण्यांत येत आहे.

४/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

५/- सदर पदोन्नत्या तात्पुरत्या व मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिका क्रमांक २७९७/२०१५ बाबतच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहतील.

६/- उक्त पदधारकांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन १०१८/सीआर-११००/एफ/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ [१-अ ] मधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

७/- शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील दि.८/६/१९९५ च्या एसआरव्ही-१०९५/ [illegible] या क्रमांकाच्या आदेशान्वये वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी

उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची योजना कार्यान्वित केली असून, उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून ती प्राधिकरणातील वर्ग-३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाच्या दि.१२ डिसेंबर १९९५ च्या एमएच/एसटीपी/१५९५/५३८/ प्र.१३ या क्रमांकाच्या आदेशान्वये लागू करण्यांत आली आहे. तसेच वित्त विभागाच्या क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९ सेवा-३, दिनांक २० जुलै २००१ तसेच, १ एप्रिल २०१० च्या शासन निर्णयानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ यापूर्वी दिला असल्यास त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यांत येऊ नये. याबाबत संबंधितांच्या सेवा पुस्तकांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करावी.

८/- शासन निर्णय क्र. एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/बारा इ.०८/०६/१९९५ नुसार वर्ग ३-४ मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्याच्या संधीच्या योजनेचा लाभ या आदेशातील ज्या कर्मचा-यांना दिलेला आहे. त्यांनी पदोन्नती जर नाकारली तर त्यांना मूळ पदावर पदावनत करण्यात येईल. तसेच शासन निर्णय दि.२३ डिसेंबर २०१५ नुसार आश्वासित प्रगती योजनेखालील पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभांची वसुली करण्यात येणार नाही.

९/- हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत संबंधित पदधारकाने पदोन्नतीच्या नेमणूकीच्या ठिकाणी कामावर रूजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

१०/- उक्त आदेशानुसार जे पदधारक पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रूजू होणार नाहीत त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यांत येईल. तसेच याबाबत प्राधिकरणाच्या क्र.एमएच/एपीटी/११९१/२४९६,प्र.७,दिनांक ७/१०/१९९४ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार त्यांचे नाव पदोन्नतीच्या निवडसूचीतून कमी करून पुढील पदोन्नतीसाठी किमान तीन वर्षे अपात्र ठरविले जाईल.

११/- संबंधित मुख्य अधिकाऱ्यांनी / विभाग प्रमुख यांनी पदोन्नत झालेल्या पदधारकांचे निश्चित पदस्थापनेचे स्वतंत्र आदेश काढावेत व त्याची प्रत प्राधिकरणाकडे पाठवून द्यावी. तसेच, सबंधित पदधारकांचे सेवापुस्तिका, अंतिम वेतन निश्चिती प्रमाणपत्र व वैद्यकीय नोंदवही (मेडीकल डायरी) पदोन्नतीनंतर रुजू होणाऱ्या कार्यालयात पाठवावी.

१२/- शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे पदोन्नती कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे सेवा ज्येष्ठतेने मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत. तसे करताना निम्न संवर्गातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीपुर्वी ते दि. २५.०५.२००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळवून सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री करुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पुर्तता होत नसल्याचे आढळून आल्यास पदोन्नती आदेश रदद करण्यात येतील.

१३/- **उपरोक्त कर्मचाऱ्यांची दिनांक ३१/०३/२०१९ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरून दिल्याची खात्री करून घेतल्याखेरीज संबंधित कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत**

करण्यात येऊ नयेत. तसेच, आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर कर्मचाऱ्यांनी मत्ता व दायित्व सादर केल्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**प्राधिकरण यांचे मान्यतेने.**

(प्रसाद उकर्डे)
**सचिव/प्राधिकरण**

**प्रति,**
**(.....................................................)**
**संबंधित पदोन्नत कर्मचा-यांना त्यांचे विभाग प्रमुखांमार्फत**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

३१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
३२. मुख्य अभियंता / प्रा. (१/२/३)
३३. मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.व पु.मं.
३४. वित्त नियंत्रक / प्रा.
३५. विधी सल्लागार / प्रा.
३६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.
३७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
३८. मुख्य अधिकारी, कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
३९. सहमुख्य अधिकारी /मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
४०. चौकशी अधिकारी / प्रा.
११. मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१२. लेखाधिकारी/प्रा./कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१४. संचालक, पी.डी.सी. पुणे

प्रत- प्रशासकीय अधिकारी/ प्रा./मुं.मं./ मुं.इ.दु.व पु.मं./कोंकण/मुं.झो सु.मं./पुणे/नाशिक/ औरंगाबाद /नागपूर/ अमरावती मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.
प्रत, अध्यक्ष, म्हाडा लिपीक संवर्ग अधिकारी व कर्मचारी संघ. मुंबई.
प्रत :- प्रशासन-५/६/७/९/१०/१२/१३/१४/१५/१६/१७/प्रा.

---***---